# पोलिसांपेक्षा सरस चोर !

## मैं और चार्ल्स

थ्रीडी

जयदीप पाठकजी
jaydeep.pathakji@timesgroup.com

'बिकिनी किलर'अशी ओळख असलेल्या आणि माध्यमांसाठी कायमच गूढ बनून राहिलेल्या इंटरनॅशनल क्रिमिनल चार्ल्स शोभराजच्या आयुष्यातील काही घटनांवर आधारित असलेला 'मैं और चार्ल्स' हा चित्रपट बायोपिक नाही. अर्थात बायोपिक नसला तरीही चार्ल्स शोभराजचे आयुष्य ग्लोरिफाय करण्यावरच लेखक-दिग्दर्शक पहिल्या फ्रेमपासून भर देताना दिसतो. चार्ल्सला भारतामध्ये शिक्षा ठोठावण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आमोद कांत या पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेतून चित्रपट उलगडत जातो. तत्कालीन संदर्भ, चार्ल्सच्या आयुष्यातील ठराविक कालावधी यांचा योग्य पद्धतीने वापर करून घेऊन एक पाहण्याजोगा चित्रपट दिग्दर्शक प्रवाल रामन सादर करतो. चोर-पोलिसांच्या खेळात चोरच कसा वरचढ आहे, ते वारंवार पटवून देण्याचा प्रयत्न होतो.

भारतीय वंशाचा फ्रेंच गुन्हेगार चार्ल्स शोभराजचे कारनामे आणि त्याने घातलेला धुमाकूळ ७०-८० च्या दशकातला! त्याचे उद्योग तसे ९० च्या दशकातही सुरू होतेच. चित्रपटाची सुरुवात बँकॉकमधून होते. समुद्रकिनारी सापडलेल्या काही मृतदेहांवरून चार्ल्सबाबतचे (रणदीप हुडा) गूढ वाढत जाते. पुढे भारतात आल्यानंतर दिल्ली, मुंबई, गोवा अशा विविध संदर्भातून कथानक



पुढे सरकते. भारतात पकडलेला चार्ल्स तिहार तुरुंगाच्या कडेकोट बंदोबस्तातून निसटतो. त्यानंतर



त्याच्या विरोधात कोर्टात खटला उभा राहतो. चार्ल्सच्या आयुष्यातील ठराविक काळ दिग्दर्शक आपल्यापुढे उभा करतो. त्या काळात तो आपल्याला घेऊन जातो. चार्ल्सला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यासाठी धडपडणारा आमोद कांत (अदिल हुसेन) चार्ल्सचा संबंध असलेल्या अनेक कथानकांच्या मुळाशी जातो आणि उलगडत जातो एक थरार! चार्ल्सच्या प्रेमात पडलेली आणि त्याच्या अदांवर फिदा असलेली कायदा शिकणारी विद्यार्थिनी मीरा शर्मा (रिचा चड्ढा) इथे एका महत्त्वाच्या भूमिकेत समोर येते. चार्ल्सला गोव्यामध्ये पकडण्यात यशस्वी झालेले मुंबई पोलिस दलातील अधिकारी सुधाकर झेंडे (नंदू माधव) ही आणखी एक व्यक्तिरेखा सोबत येते.

दिग्दर्शक प्रवाल रामनने बराच काळ रामगोपाल वर्माकडे सहायक दिग्दर्शक म्हणून काम केल्यामुळे रामगोपाल वर्माचा प्रभाव 'मैं और चार्ल्स'वर जाणवत राहतो. अनेक प्रसंगांसाठी वापरलेली ग्रे शेड, काळोखाचा जास्तीत जास्त वापर वर्माच्या चित्रपटांची आठवण करून देतो. चार्ल्सविरोधात कोर्टात सादर केलेले पुरावे आणि या पुराव्यांची जोडणी करण्यासाठी आमोद कांतने वापरलेली युक्ती पडद्यावरच पाहणे इष्ट! 'बिकिनी किलर'ची बिरुदावली मिरवणाऱ्या चार्ल्सचं आयुष्य दाखवायचं म्हणजे दिग्दर्शकाला अगदी हवी तशी मोकळीक होती. रिचा चड्ढासह ही मोकळीक सर्वांनीच 'एन्जॉय' केल्याचं दिसतं. रणदीप हुडाची बॉडी लँग्वेज, त्याचा ॲपिअरन्स अगदी चार्ल्स शोभराजच्या भूमिकेत फिट्ट बसतो. लक्षात राहतो तो आदिल हुसेनचा अधिकारी! नंदू माधवही एका महत्त्वाच्या भूमिकेत स्वत:ची छाप पाडून जातो.

**निर्माते :** विक्रम खक्कर, राजू चड्ढा, अमित कपूर
**दिग्दर्शक :** प्रवाल रामन
**संकलन :** निपुण गुप्ता
**छायांकन :** अनुज धवन
**कलाकार :** रणदीप हुडा, रिचा चड्ढा, नंदू माधव
**दर्जा :** ★★★

# हॅलो गोवा

लोकमत

गोवा, सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०१४




पडद्यावर झळकणार : झेंडेची भूमिका साकारणार नंदू माधव, रणदीप हुडा 'चार्ल्स'

# चार्ल्स शोभराज पुन्हा येतोय

संदीप आडनाईक • पणजी

१९८६ मध्ये पर्वरीतील ओ कोकेरो हॉटेलमध्ये ठाणे, मुंबईहून आलेल्या इन्स्पेक्टर मधुकर झेंडे यांनी नाट्यमयरित्या अटक झालेला आंतरराष्ट्रीय गुन्हेगार, बिकिनी किलर चार्ल्स शोभराज याचा पुतळा त्याच पर्वरीतील त्या हॉटेलात आल्यानंतर बसविला. चार्ल्सला पुन्हा पडद्यावर पाहण्याची संधी लवकरच लाभणार आहे. चार्ल्स शोभराज याच्या जीवनावर आधारित 'मै और चार्ल्स' हा आंतरराष्ट्रीय चित्रपटात लवकरच येत असून त्यात अभिनेता रणदीप हुडा चार्ल्स शोभराजची तर मराठी अभिनेता नंदू माधव इन्स्पेक्टर मधुकर झेंडेची भूमिका साकारत आहे.

नंदू माधव यांचा हा पहिला हिंदी चित्रपट आहे. पूजा भट या चित्रपटाची निर्माती असून प्रवाळ रमन या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. ४५ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी गोव्यात आलेल्या नंदू माधव यांनी ही माहिती 'लोकमत'ला सांगितली.

दिग्दर्शक प्रवाळ यांनी यापूर्वी रामगोपाल वर्मा यांच्या 'डरना मना है,' 'डरना जरूरी है,' 'गायब,' 'डार्लिंग,' '४०४ एरर नॉट फाउंड' या चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. अभिनेता नंदू माधव यांनी या चित्रपटात चार्ल्सला पकडणाऱ्या बेधडक आणि बेफाम इन्स्पेक्टर मधुकर बापूराव झेंडे यांची भूमिका केली आहे. ही भूमिका म्हणजे माझ्यासाठी एक आव्हान होते, असे नंदू यांनी सांगितले. झेंडे यांची कारकीर्द आव्हानांनी भरलेली होती. गोव्यात सहा महिन्यांपूर्वी या चित्रपटातील काही प्रसंगांचे चित्रीकरण झाले होते. त्या वेळी नंदू माधव गोव्यात आले होते.

चार्ल्स शोभराजच्या भूमिकेत अभिनेता रणदीप हुडा याचा फर्स्ट लूक प्रसिद्ध झाला आहे. याशिवाय रिचा चढ्ढा आणि आदिल हुसेन यांच्याही या चित्रपटात भूमिका आहेत. या चित्रपटाचे पूर्वीचे नाव 'बंद' असे होते; परंतु नंतर ते 'मै और चार्ल्स' असे बदलण्यात आले. तपास अधिकारी आमोद कांत यांचे चार्ल्ससंदर्भातील जे साक्षीदार होते, त्या प्रत्येक व्यक्तिभोवती या चित्रपटाचे कथानक गुंफलेले आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले असून अमेरिकेत तो प्रदर्शित करण्याचे नियोजन सुरू आहे. चित्रपटात अनेक आंतरराष्ट्रीय कलाकार असून चार्ल्सच्या गुन्ह्याचा तपास करणारे पोलीस अधिकारी आमोद कांत यांनी या चित्रपटासाठी दिग्दर्शक प्रवाळ रमन यांना परवानगी दिली आहे. कांत हे चार्ल्सच्या घडामोडींचे साक्षीदार आहेत.



६ एप्रिल १९८६ रोजी पर्वरीतील ओ कोकेरो हॉटेलमध्ये चार्ल्स शोभराज ज्या खुर्चीवर बसला होता तिथे आज त्याचा पुतळा बसवण्यात आला आहे. इनसेटमध्ये चार्ल्स शोभराज.



चार्ल्स शोभराजच्या लूकमध्ये रणदीप हुडा



इन्स्पेक्टर मधुकर झेंडे झालेले नंदू माधव.

चार्ल्स शोभराज हा बिकिनी किलर त्याच्या आयुष्यात एक दंतकथा बनून राहिला होता. ६ एप्रिल १९८६ मध्ये गोव्यात पर्वरी येथे पर्वरीतील ओ कोकेरो या हॉटेलमध्ये त्याला इन्स्पेक्टर मधुकर झेंडे यांनी अटक केली होती. या हॉटेलमध्ये तो असल्याचा सुगावा इन्स्पेक्टर झेंडे यांना लागला होता. आधी पाच पोलीस ठाण्यात तैनात असलेल्या झेंडे यांनी त्यानंतर गोव्याकडे धाव घेतली. नामांतर करून उतरलेल्या चार्ल्सला त्याच्या खऱ्या नावाने हाक मारताच त्याने झेंडे यांच्याकडे पाहिले आणि तोच क्षण चार्ल्स पकडण्याची खरी घटना. झेंडे यांनी त्याच्यावर झडप घातली होती. पहाडी आवाज आणि बलदंड शरीरयष्टीच्या झेंडे यांनी १९७१ मध्ये दोन वेळा तिहार जेलमधून पळालेल्या तर गुन्ह्यात गुंतलेल्या चार्ल्सला पकडले होते. झेंडे यांनी चार्ल्सला दोनवेळा पकडण्याचा प्रताप केला होता. आता हा सारा इतिहास चित्रपट निर्माते प्रवाळ रमन यांच्या 'मै और चार्ल्स' या चित्रपटातून रसिकांना पाहायला मिळणार आहे.

४५ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, गोवा
गोमन्तक फिल्मसिटी
45th International Film Festival of India, Goa
Monday 24, November 2014
आजच्या 'गोमन्तक' अंकात इफ्फीच्या संपूर्ण ताज्या व विशेष बातम्या त्याचप्रमाणे विश्वासार्ह माहिती जरूर वाचा अथवा epaper.dainikgomantak.com या संकेतस्थळाला भेट द्या.

## बॉलिवूडच्या पडद्यावर अवतरणार

# चार्ल्स शोभराजचा थरार!

### अभिनेते नंदू माधव साकारणार इन्स्पेक्टर मधुकर झेंडेंची भूमिका

योजना पाटील

पणजी, ता. २४ : बिकिनी किलर... इंटरनॅशनल स्मगलर... बुलेटस्वार गुंडा... तो जिवंतपणीच आख्यायिका होऊन राहिला आहे. जगभरातल्या पोलिसांना गुंगारा देणाऱ्या चार्ल्स शोभराजला मराठी बाण्याच्या मधुकर झेंडेंनी तुरुंगाची हवा खायला लावली. असे हे थक्क करणारे चार्ल्स आणि मधुकर झेंडेंचे व्यक्तिमत्त्व बॉलिवूडच्या पडद्यावर अवतरते आहे. आपल्या चतुरस्र अभिनयाने रसिकांच्या मनाचा ठाव घेणारे नंदू माधव या सिनेमात मधुकर झेंडेंच्या भूमिकेत पहायला मिळणार आहेत.

'गोमन्तक'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत नंदू माधव यांनी मधुकर झेंडेंच्या भूमिकेचं गुपित खोललं. तब्बल अकरा ललनांच्या हत्येचा आरोप असणारा चार्ल्स शोभराज दुनियाभरातील पोलिसांना हवा असलेला गुन्हेगार. समुद्री किनाऱ्यांचे प्रदेश त्याच्या विशेष आवडीचे.

या किनाऱ्यांच्या ओढीनेच त्याला गोव्यात आणलं. आणि आपल्या हातात बेड्या घालणारा जन्माला यायचा



आहे, हा त्याचा भ्रम खोटा ठरला. सामर्थ्य आणि चतुराईची मिसाल असणाऱ्या मधुकर झेंडेंनी निव्वळ चार्ल्सच्या बुलेट प्रेमावरून त्याचा माग काढला आणि गोव्यातील पर्वरी येथील ओ कोकेरो हॉटेलात चार्ल्स फिशकरीवर ताव मारत असताना त्याच्या हातात बेड्या ठोकल्या.

बॉलिवूड ड्राम्यात फिट बसणारी अशीच ही कथा. त्यामुळे बॉलिवूड या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षित नाही झाला तरच नवल. चार्ल्सला रुपेरी पडद्यावर उतरवण्याचं धाडस रमण प्रवल या दिग्दर्शकाने केलं आहे. चार्ल्सची भूमिका अभिनेता रणजित हुडा साकारत आहे, तर चार्ल्स इतकीच महत्त्वाची इन्स्पेक्टर मधुकर झेंडेंची भूमिका आपण करीत असल्याचे नंदू माधव यांनी सांगितले.

२७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या या सिनेमाचे चार देशांमध्ये चित्रीकरण झाले आहे. चार्ल्स शोभराजच्या आयुष्याचा माग काढत 'मैं और चार्ल्स'ची टीम दहाहून अधिक लोकेशन्सवर भटकली आहे. दिल्ली, मुंबई आणि गोव्यातही सिनेमाचा महत्त्वपूर्ण भाग चित्रित झाल्याचे माधव यांनी सांगितले.

**रसिक म्हणून इफ्फीचा आस्वाद**

नंदू माधव यांचे हरिश्चंद्राची फॅक्टरी, वळू, मर्मबंध, टपाल यासारखे सिनेमे इफ्फीत प्रदर्शित झाले आहेत. यंदाच्या इफ्फीत त्यांचा सिनेमा नसला तरी केवळ रसिक म्हणून जगभरातल्या दर्जेदार सिनेमांचा आस्वाद घ्यायला गोव्यात आल्याचे त्यांनी सांगितले. इफ्फीतील इराणी दिग्दर्शक मोहसेन मखमलबाफ यांचा सलाम सिनेमा विशेष भावल्याचे त्यांनी नमूद केले.